# मातीचा पुत्र

प्रा. यशपाल **भिंगे**

**प्रसिद्ध** चित्रकार आणि शिल्पकार प्रमोद दत्तात्रय कांबळे यांच्यायोगे मला या लेखास 'मातीचा पुत्र' हे शीर्षक द्यावेसे वाटले. पण हे शीर्षक काही माझी स्वत:ची निर्मिती नाही. याला संदर्भ आहे या कलेच्या इतिहासातील प्रतिभावंत बंगाली कलाकार रामकिंकर वैज यांचा. ज्यांचे हात केवळ मातीला सुंदर सुंदर आकार देण्याकरिताच निर्माण झाले होते, ज्यांच्या पायाखालची माती प्रतिभासंचारी होती. त्यांच्या जादूई बोटांनी रंग आणि माती या दोहोंना मनोहर कसरती करायला लावल्या. त्यांनी रंगवलेली बंगाली संथाळ आदिवासींची श्रमचित्रे भारताच्या चित्र इतिहासात अमर ठरली आहेत. तसेच त्यांच्या शिल्प व्यक्तिचित्रणाची तुलना जगविख्यात ब्रिटिश शिल्पकार जेकब एप्स्टाइन यांच्या ब्रॉंझमधील व्यक्तिचित्रांशी केली जाते. पु.ल. देशपांडे यांनी आपल्या 'मैत्र' संग्रहात रामकिंकरावर खूप सुंदर लिहिले आहे. अहमदनगरच्या प्रमोद कांबळेंच्या निमित्ताने - केवळ तुलना म्हणून नव्हे तर अगदी प्रांजळपणे या लेखाचे शीर्षक आणि वरील संदर्भाची याद झाली.

भारतीय चित्रकलेच्या इतिहासाला इथल्या राजकीय इतिहासाची भूमी आहे. परंपरागत भारतीय चित्रकलेला मोगल काळात पर्शियन





मिनिएचर तंत्राने प्रभावित केले. पुढे ब्रिटिश सत्तेचा साम्राज्यवादी प्रभाव तिच्यावर पडला व तिला 'अकॅडमिक' रूप येऊ लागले. धर्म आणि राजसत्तेचा मोठा प्रभाव जगातल्या चित्रइतिहासावर पडलेला आहे. १९ व्या व २० व्या शतकाच्या सीमारेषेवर उभा असलेला भारतीय चित्रकलेचा प्रवर्तक राजा रवि वर्मा केरळात जन्मला. बडोदा दरबारातून आंतरराष्ट्रीय पातळीवर गेला. त्याच्या चित्रांचा प्रभाव केवळ चित्रकलेपुरता नाही तर सर्वच कलांवर पडलेला दिसतो. अगदी बालगंधर्वांनी देखील त्यांच्या चित्रांतील स्त्री-पुरुषांच्या वस्त्र प्रावरणांपासून धडा घेतला, असे म्हणतात. ब्रिटिश काळात भारतीय चित्रकलेला विशेष गती मिळाली. १८५६ साली मुंबईत 'जे. जे.'चे रोपटे लावले गेले. लॉकवूड किप्लिंग, जॉन ग्रिफिथ्स, सेसिल एल. बर्नस यासारख्या जग श्रीमंत चित्रकारांनी गुरुपद सांभाळले. यातूनच महाराष्ट्राला रावबहादूर धुरंधर, आबालाल रहिमान, फैजी रहमान, प्रल्हाद अनंत धोंड, एम.एन. कीर्तीकर, ना. श्री. बेंद्रे, माधव सातवळेकर, मकबूल फिदा हुसेन, एस.एम. पंडित, वासुदेव गायतोंडे, बाबुराव पेंटर, दीनानाथ दलाल, प्रभाकर बरवे, द. ग. गोडसे अशी कितीतरी दिग्गज चित्रमंडळी मिळाली. तिकडे बंगालमध्ये अव्वल इंग्रजी काळात अबनींद्रनाथ आणि गगनेंद्रनाथ हे टागोर घराण्यातले चित्रकार, शिल्पकार देविप्रसाद रॉय - चौधरी, रामकिंकर वैज किंवा नंदलाल बोस यांची नावे घेता येतील. तसेच कर्नाटकातील के. के. हब्बर अथवा मध्यप्रदेशातील सय्यद हैदर रझा अशांनी भारतीय चित्रकलेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या साऱ्या समृद्धीची व प्रतिष्ठेची भूमी कमी अधिक संदर्भाने 'जे.जे.' मुंबईची आहे. इथूनच ही मंडळी जगभर पोचली. ही सगळी पोथी सांगण्यामागे केवळ आढाव्याचे गणित नाही तर या सर्व जुन्या कलाकारांची चरित्रे आणि आजचे आघाडीचे कलाकार प्रमोद कांबळेंचा जीवनप्रवास यांचा संबंध शोधणे हा होय.



राष्ट्रपती मा. कलामांसह प्रमोद कांबळे

भारतीय भूमीतील कलावंतांना युरोपातील कलावंताप्रमाणे आपल्या कलेच्या आधारे स्थिर जीवन अगदी आजही जगता येत नाही. याला काही अपवाद असतीलही. निखळ कलेचं जग असतं. त्यात कलावंतांचा हुकमी आवाज असतो. हे आपला समाज मान्यच करीत नाही. साहित्य वगळता इतर कलांतील कलात्मकता निराळ्या स्वरूपाची असते. ती कलावंतांच्या अमर्याद स्वातंत्र्याची भोक्ती असते. तिचा अभिजात स्वरूपी आस्वाद घ्यायचा तर आपले कलांद्रिय तीक्ष्ण विषारी होऊ नये याची काळजी समाजाने घ्यायला हवी. तसे मार्गदर्शन करणारी कलासमीक्षा निर्माण व्हायला हवी. अन्यथा उथळ कारागिरीलाच बाजारू प्रयोगवादाचे रुप येईल आणि अभिजात कला धोक्यात येईल. भारतीय अभिरुचीला पोटार्थी जगण्याचे संदर्भ असल्याने कलावंतांचे कलंदरपण मर्यादित अर्थाने समाज मान्य करतो व त्याचे भणंगपण प्रमाण मानतो. त्यामुळे कलावंत भुकेकंगाल फटीचरच असला पाहिजे. त्याने कलेच्या अंगाने श्रीमंत व्हावे परंतु निजी जीवनात दरिद्री रहावे-अशी आपल्या समाजाची

# मातीचा पुत्र



तैलरंगातील सीस्केप

पूर्वापार पक्की बनलेली मानसिकता आहे. त्यामुळेच रावबहादूर धुरंधर असो की, एम.एफ. हुसेन असो. आबालाल रहिमान असो की रामकिंकर वैज असो, अशा साऱ्या महान कलाकारांना अत्यंत कष्टप्रद जीवन जगत आपली कला जपावी लागली आहे. या परंपरेत नगरचा प्रमोद कांबळे देखील येतो. एखादी चांगली व्यक्ती ही अनेक चांगल्या लोकांचे मिश्रण असते, असे मी मानतो. हे कलावंताला देखील लागू पडेल. केवळ कलेच्याच पातळीवर नाही तर जगण्याच्या देखील. प्रमोद कांबळेचा जीवन प्रवास पाहिला आणि मला वरील अनेकांची आठवण झाली. फुटपाथवर झोपणारा हुसेन आठवला. कोल्हापूरच्या आपल्या प्रपंचात लुप्त झालेला आबालाल रहिमान आठवला. भणंगपणाने व्यसनात संपलेला पोलादी शिल्पासारखा काळाकभिन्न राम किंकर आठवला. याच परंपरेतला आजचा प्रमोद कांबळे प्रतिकूल परिस्थितीतून ऊर्जा वेचणारा. उद्याच्या प्रकाशाच्या भरवशावर अंधार तुडविणारा. रंगांचे इंद्रधनुष्य न्याहाळताना वेदनेचे चटके सोसणारा. एक अमर्याद कलंदर बाण्याचा प्रयोगशील प्रवाही कलावंत.

मूळचा व आजही नगरचाच असलेला प्रमोद कांबळे मोठा चमत्कारिक कलाप्रवासी आहे. 'चमत्कारिक' म्हणण्याला कारण असे की, प्रमोदनी अनेकवेळा मुद्दामहून उलट्या प्रवाहात उडी मारण्याचे धाडस केलेले आहे. आजची रीत अशी आहे की जन्मभूमी सोडून महानगरात जायचे, तेथून बळ घेऊन जगात मोहिमा चालवायच्या. पुन्हा आपल्या जन्मभूमीकडे ढुंकून पहावयाचे नाही. यालाच विकास म्हणायचे. परंतु प्रमोदने असे केले नाही. नगरला गरीब कलाशिक्षकाच्या घरी जन्मला. बालपणापासून हरहुन्नरी ठरला. मार्क्समेमोपेक्षा कॅनव्हास आणि मातीमध्ये रमला. पुढे मुंबईला गेला 'जे.जे.'त सुवर्णपदक मिळविले, बॉम्बे आर्ट सोसायटीच्या पुरस्काराचा मानकरी झाला. एक रुपये तासापासून शंभर रुपये तासापर्यंत विस्तारला. मुंबई-पुणे-समर्थ आर्ट सर्व्हिस-फिल्म लाईन अशी भ्रमंती करून पैसाही मिळवला परंतु गावच्या 'सिना' नदीच्या मातीचा कुंभारगल्लीतील स्पर्श केवळ हातापुरता नव्हता तर मनाच्या, प्रतिभेच्या भूमीला झाला होता. त्यामुळे सारे



सूक्ष्म निरिक्षण : डौलवार ऐरावत!



संगमरवर नव्हे फायबर मेडियात साकारलेले साईबाबा





गेंडा आणि झेब्रा : चकित करणाऱ्या शिल्पाकृती

मोहाचे पाश बेमालूमपणे तोडून नगरमध्ये येऊन स्थाईक झाला. र.बा. केळकरांसारख्या तपस्वी चित्रकाराची ही भूमी. केळकरांच्या संदर्भाने मी वाचलेलं इथे नमूद केले पाहिजे. प्रख्यात चित्रकार सय्यद रझा हे केळकरांवर गुरु म्हणून खूप श्रद्धा ठेवत. ते केळकरांना एकदा भेटायला मुद्दाम टॅक्सीने मुंबईहून नगरला आले पण केळकरांची भेट होऊ न शकल्यामुळे निराश होऊन परतले. परंतु गुरुभूमीला भेट देता आली याचा मोठा आनंद रझांना झाला व त्यांनी टॅक्सीचालकास सहाशे रुपये आगावूचे बक्षीस म्हणून दिले. अशा थोर गुरुचे शिष्य होण्याचे भाग्य प्रमोदला देखील मिळाले. भारतीय चित्रपरंपरेत द्विमिती स्वरूपाची म्हणजे सपाट चित्रे काढली जात. पुढे फ्रेंच आणि ब्रिटिश चित्रतंत्रामुळे त्रिमिती (थ्रीडी) चित्रे काढण्याची कला प्रमोदला शिकविली. त्यातून प्रमोदमधल्या कलावंताची घडण होऊ लागली. इयत्ता सातवीत असतानाच केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या विशेष प्रावीण्य शिष्यवृत्तीसाठी शिल्पकलेमध्ये देशात त्याने प्रथम क्रमांक मिळविला. आठवीत असताना वडिलांची नोकरी गेली आणि घरात दारिद्र्याचे बस्तान बसले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करताना प्रमोदला पेपर टाकण्यापासून ते पतंग बनविणे, पेंटरच्या हाताखाली काम करणे, निवडणुकीत भिंती रंगविणे अशी कामे करावी लागली. पण त्याने कलाध्यास सोडला नाही. दहावी कसाबसा पास होऊन तो मुंबईला 'जे.जे.'त दाखल झाला. घरची कुठलीच मदत न घेता पडेल ती कामे आणि पोटात पडेल ते घेत प्रसंगी गटागटा पाणी पिऊन जगत राहिला. 'चहा-भाता'ची स्पेशल डिश यातूनच निर्माण झाली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट बनवत, चित्रपटांचे बॅनर रंगवत, बस स्टॉपवर चित्रांचा सराव करीत मुंबईच्या कलाजगतावर आपली मुद्रा त्याने उमटविली. पुढे पुण्याला गेला पण तेथे रमला नाही आणि विचारपूर्वक नगरला येऊन पक्का झाला. पाब्लो पिकासो स्पेनमधील ज्या मलागा या शहरात वाढला तेथे चित्रकाराला 'उल्लू' म्हणण्याची पद्धत होती. असाच अनुभव प्रमोदला नगरला आला. येथे आल्यावर पुन्हा पोटासाठी कलेचे कातडे ओरबाडून त्याला रक्तबंबाळ व्हावे लागले. गणेशोत्सवात देखावे, लग्नपत्रिका डिझाईन, पोर्ट्रेट, व्हिजिटिंग कार्ड, तमाशाची पोस्टर्स अशी निव्वळ भाकरीची कामे त्याला करावी लागली. पण त्याने जिद्द सोडली नाही. आपली कलेची भूक टाकली नाही. चित्रकार असल्याने लग्न जुळत नव्हते. तेव्हा त्याने स्वातीशी आंतरजातीय विवाह केला. याचाही खूप त्रास त्याला झाला.

१९९७ मध्ये भारतीय स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने प्रमोदने महापालिकेच्या महावीर कलादालनात ७० फूट बाय २० फूट आकाराच्या भिंतीवर पाचशे भारतीय सुपुत्रांचे आगळेवेगळे पेन्सिल चित्र तयार केले. सलग ७२ दिवस म्हणजेच ०१ हजार सातशे अठ्ठावीस तास त्याने काम केले. लोकांनी खूप त्रास दिला. विविध धर्म संघटनांनी आपल्या सनातनी चोचीने चित्रे फाडण्याचा प्रयत्न केला. पण प्रमोदच्या जिद्दीने त्यावर मात केली. एकदाही खोडरबराचा वापर त्याने केला नाही हे विशेष. आता हे पेन्सिल शिल्प पहाण्यासाठी फॉरेनर्सदेखील नगरमध्ये येऊ लागलेत. 'सारे जहाँसे अच्छा' असे या प्रकल्पाला प्रमोदने नाव दिले. पुढे त्याने नगरला भेट देणाऱ्या जयंत नारळीकर, श्याम बेनेगल, राजदत्त, आर. के. लक्ष्मण, शरद पवार, भीमसेन जोशी अशांची रेखाटने किंवा शिल्प तयार करून त्यांना अनोख्या भेटी दिल्या. पुढे त्याने 'एमआयआरसी'चा गौरवशाली इतिहास दाखविणारे 'दि स्पिरिट' हे पेन्सिल चित्र १० फुट बाय १० फूट भिंतीवर रेखाटले व 'वॉर मेमोरिअल' सारखे अप्रतिम शिल्पदेखील तयार केले. याबद्दल लष्कराकडून त्याचा सन्मान झाला. या कामांमुळे त्याला प्रचंड लोकप्रियता मिळाली.

प्रमोदच्या आजपर्यंतच्या कामात सर्वात उठावदार ठरलेले त्याचे काम म्हणजे मध्यप्रदेशातील चित्रकूट येथे माजी खासदार नानाजी देशमुख यांच्या प्रेरणेने उभारलेले 'नन्ही दुनिया' हे बालउद्यान. आई व मूल ह्या नात्याची वात्सल्यदर्शी प्राणिशिल्पे त्याने अशा बेमालूमपणे उभारली की तत्कालीन राष्ट्रपती व कलाभ्यासक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे प्रमोदशी पत्रिकेत नमूद नसतानाही तब्बल चौदा मिनिटे बोलले व त्याच्या कलेला सन्मानाने दुजोरा दिला व भारतातील अन्य प्रकल्पासाठीही त्याची विचारणा केली. ही प्रशंसा आणि प्रेरणा घेऊन प्रमोदने पुढे फायबर स्कल्पचर कामात महाराष्ट्रात आणि भारतात आपले प्रस्थ निर्माण केले. मागील वर्षी झालेल्या फ्रान्स दौऱ्यात प्रमोदला युरोपियन मराठी संमेलनात चित्र व शिल्पकलेचे प्रात्यक्षिक करण्याची संधीही मिळाली.



स्टील लाईफ : मिक्स मेडिया

प्रयोगशीलता आणि व्यावसायिकता यांचा समतोल साधण्याचे कसब परिस्थितीने प्रमोदला शिकविले. आज तो आपल्या कलेने जग सुंदर करू लागलाय. याबरोबरच स्वत:च्या भणंगपणावरु देखील त्याने मात केलीय. प्रयोगशीलतेकरिता कलावंताजवळ खूप पैसे हवेत अन्यथा परिस्थितीच्या जबड्यात आवळलेला कलाकार हताशपणे शेवटी कारागिर होतो, ही प्रमोदची भूमिका विचार करायला लावणारी आहे. चित्रकला आणि मूर्तीकला अशा दोन्ही कलांत निष्णात असलेल्या या कलंदर कलावंताने साईबाबाची शिर्डी सुंदर केलीय. बडोद्याचे अक्षरधाम मंदिरात अक्षरकला निर्माण केलीय. बुलढाणा जिल्ह्यातील नानीज सजवलय. नांदेडला गु रु- ता - ग द्दी च्या निमित्ताने महापुरुषांचे पुतळे सजवले, बालोद्यान सजविले. माझे शहर सुंदर करणाऱ्या या कलावंताची ओळख मला चौकाचौकातील त्याच्या मनोहर शिल्पांनी करून दिली आहे. त्याची शिल्पे पहाताना सुप्रसिद्ध शिल्पकार देविप्रसाद रॉय - चौधरी यांच्या शिल्पांची आठवण होते. ज्याला चित्रकलेच्या भाषेत 'ड्राफ्टसमनशिप' म्हणतात. म्हणजे माणसांची, प्राण्यांची शरिरांची, त्यांच्या अवयवांची जडणघडण, स्नायूंच्या पाठीमागे लपलेल्या हाडांची रचना हे सारे जेव्हा निर्दोष उतरते तेव्हा त्याला चांगली 'ड्राफ्टसमनशिप' म्हणतात. यातले प्रमोदचे कसब लक्षणीय स्वरूपाचे आहे.



लाईफ पोर्ट्रेट

नगरसारख्या तशा आडवळणाच्या गावात प्रमोदला कलेच्या संदर्भाने सुंदर स्वप्ने पडतात. ते प्रत्यक्ष उतरवण्यासाठी जी सामग्री अपेक्षित आहे ते सारं त्याच्याकडे आहे. त्यामुळेच त्याने नगरच्या गुलमोहर रस्त्यावर आपल्या घराजवळ एक आर्ट गॅलरी उभारली आहे. तेथे दिवसभर गर्दी असते. कला म्हणजे समाजाचे अस्तित्व. म्हणून त्या समाजाभिमुख झाल्या पाहिजे. कलेच्या प्रांतात आपण दिवसेंदिवस कोरडे होत चाललो आहोत त्यामुळेच सामाजिक जीवनात कमालीचा उथळपणा माजला आहे. याच भूमिकेतून प्रमोद आता नगरला 'कलरसिटी' करू इच्छितो. चौकाचौकात 'कलासंगम' निर्माण करू इच्छितो, जगातल्या संस्कृतीचा चेहरा असलेलं 'मास्क म्युझियम' निर्माण करू इच्छितो. इथली व्यवस्था आणि समाज मानसिकता त्याला साथसंगत करेल अशी अपेक्षा करू या. प्रमोदची प्रेरणा घेऊन अन्य प्रदेशातील कलावंत देखील हुरूप घेऊन काम करू लागतील असे वाटते. माझे कलावंत मित्र नयन बाराहाते यांच्याकडून सातत्याने प्रमोदबद्दल मी विस्मयाने ऐकत होतो. या लेखाच्या निमित्ताने त्याला जवळून न्याहाळता आले याचा मला खूप आनंद होतो आहे. शेवटी, प्रमोद कांबळे बद्दल-पिकासोच्या आईने पिकासोद्दल काढलेले उद्गार-उद्धृत करतो आणि त्याला शुभेच्छा देऊन थांबतो.

'He was an angel and a devine in beauty'.